# वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावयाचे पृष्ठ

## पोलीस शिपाई चालक भरती २०१९ -

जाहीरात क्रमांक-३/२०१९ दिनांक :- ३०/११/२०१९

पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक यांची २० रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदन पत्र संगणकीय प्रणालीद्वारे दिनांक ०२.१२.२०१९ ते दिनांक २२.१२.२०१९ या कालावधीत भरण्यात येणार आहेत. याबद्दलची सविस्तर माहिती www.mahapariksha.gov.in, www.sindhudurgpolice.gov.in आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहितीकरिता प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

- महाराष्ट्र सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक चालक, पोलीस हवालदार चालक, पोलीस नाईक चालक व पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) नियम २०१९ मधील तरतुदी पोलीस शिपाई चालक पदासाठी लागू आहेत.
- पोलीस शिपाई चालक पदासाठी उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावा लागेल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा www.mahapariksha.gov.in या पोर्टलवर उपलब्ध राहणार आहे. पोलीस शिपाई चालक पदासाठी एकाच पोलीस घटकात एकापेक्षा जास्त अर्ज करण्याची मुभा नाही. जर एका उमेदवाराने एकाच पोलीस घटकातील पोलीस शिपाई चालक पदासाठी एकापेक्षा अधिक अर्ज केलेले आहेत, असे आढळून आले तर अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल.
- पोलीस शिपाई चालक पदाच्या आवेदन अर्जासाठी उमेदवारांची लेखी परीक्षा महापरीक्षा पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने आधी घेण्यात येणार आहे. शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचे मोजमाप व शारिरीक चाचणी उमेदवाराने ज्या पोलीस घटकासाठी अर्ज केला आहे, त्या पोलीस घटकामार्फत घेण्यात येईल. दोन घटकातील शारिरीक चाचणीच्या तारखा एकाच दिवशी आल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही व त्यामध्ये बदल करता येणार नाही.
- उमेदवारांनी आवेदन अर्जात अचुक माहिती द्यावी. चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. उमेदवारांची लेखी परीक्षा व शारिरीक चाचणीनंतर ज्या उमेदवारांची निवड होईल त्यांचीच सर्व मूळ कागदपत्रे तपासण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांकडे योग्य कागदपत्रे नसतील तर तो अपात्र होईल. केवळ लेखी परीक्षा व शारिरीक चाचणीद्वारे निवड झाली म्हणून तो पात्र ठरणार नाही.
- **सेवाप्रवेश नियमांमधील तरतुदींनुसार भरती प्रक्रियेमध्ये प्रथम लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यानंतर गुणवत्तेनुसार शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी घेण्यात येईल. सदरहु वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी ही अर्हता चाचणी असेल. त्यानंतर उमेदवारांची शारिरीक चाचणी घेण्यात येईल.** ऑनलाईन घेण्यात आलेली लेखी परीक्षा व शारिरीक चाचणीत प्राप्त झालेल्या एकूण गुणांच्या गुणवत्तेनुसार तात्पुरती निवडसूची तयार करण्यात येईल. तात्पुरत्या निवडसूचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मूळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल. निवड यादीतील उमेदवरांची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल, निवड यादीमध्ये उमेदवारांच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.
- जाहिरातीतील नमुद केलेल्या रिक्त पदांची एकूण संख्या/पूर्ण पदे भरण्याबाबत शासन आदेशाच्या अधीन असेल, पद संख्या कमी झाल्यास उमेदवारास निवडीबाबत कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.
- पोलीस शिपाई चालक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारिरीक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे/कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सूचना www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहीरातीमध्ये उपलब्ध आहेत. **सदरहू जाहिरात काळजीपूर्वक वाचून, समजून घेऊन व रिक्त पदांबाबतची खातरजमा करुन उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.**

(दीक्षीत गेडाम)
पोलीस अधीक्षक,सिंधुदुर्ग